मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांच्या अधिपत्याखालील अंधेरी न्यायालयाकरीता नवीन उद्‌वाहन बसविण्याकरीता प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

शासन निर्णय क्र.संकीर्ण ०२१७/३५/प्र.क्र.५६/का-११

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २५ जून, २०१९

संदर्भ :-

१) मा.उच्च न्यायालयाचे No.B(W)६०६३/१९८६/५३/४६१/२०१७, दि. ०७.०१.२०१७ रोजीचे पत्र.
२) मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांचे ५१८७/१६,दि.१८.१०.२०१६ रोजीचे पत्र.
३) मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांचे ७३३/१६,दि.१९.०५.२०१७ रोजीचे पत्र.
४) मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांचे ३२/२०१८,दि.०८.०१.२०१८ रोजीचे पत्र.

प्रस्तावना:-

मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांच्या अधिपत्याखालील अंधेरी न्यायालयाकरीता (तळ+तीन मजले) १६ पॅसेंजर वाहून नेण्याइतकी क्षमता असलेले उद्‌वाहन बसविण्यासाठी येणा-या रु.३६,५९,९३५/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव संदर्भिय अ.क्र.१ येथील पत्रान्वये मा.उच्च न्यायालयाने शासनास सादर केला होता. त्यामध्ये ८% सेंटेज चार्जेस वगळण्याबाबत नमूद केले होते. त्यानुसार सदर प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांच्या अधिपत्याखालील अंधेरी न्यायालयाकरीता (तळ+तीन मजले) १६ पॅसेंजर वाहून नेण्याइतकी क्षमता असलेले उद्‌वाहन बसविण्यासाठी येणा-या रु. ३३,८८,८५६/- (रुपये तेहत्तीस लाख अठ्ठयाऐंशी हजार आठशे छप्पन फक्त) इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास / खर्चास पुढीलप्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	बाब	प्रस्तावित केलेली अंदाजित रक्कम रुपये	सार्वजनिक बांधकाम विभागाने परिगणित केलेली रक्कम रुपये	८% सेंटेज चार्जेस वगळून आलेली रक्कम रुपये
१	मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई यांच्या अधिपत्याखालील अंधेरी या न्यायालयाकरीता उद्‌वाहन बसविणे.	रु.३६,५९,९३५/-	रु.३६,५९,९३५/-	रु.३३,८८,८५६/-
	एकूण	रु.३६,५९,९३५/-	रु.३६,५९,९३५/-	रु.३३,८८,८५६/-

२.	सदर प्रकरणी तांत्रिक मान्यतेच्या अनुषंगाने तांत्रिक रक्कम वाजवी राहील याबाबतची दक्षता घेण्यात यावी. तसचे प्रचलित कार्यपध्दतीचा अवलंब करुन ई-निविदा प्रक्रिया सार्वजनिक बांधकाम विभागाकडून राबविण्यात यावी. प्रशासकीय / तांत्रिक मान्यतेच्या अनुषंगाने इतर विहित नियमानुसार अनुषांगिक सर्व कार्यवाही पूर्ण करावी.

३.	यावरील खर्च मागणी क्र.जे-१,२०१४ न्यायदान, १०७-इलाखा शहर दंडाधिकारी न्यायालये,(००)(०१) इलाखा शहर दंडाधिकारी न्यायालये, (२०१४ ०२३४) या लेखाशिर्षाखालील १३-कार्यालयीन खर्च यामधून भागविण्यात यावा. तसेच सदर निधी पुरवणी मागणी / पुनर्विनियोजनाद्वारे तसेच त्या-त्या वित्तीय वर्षात आर्थिक तरतूद करुन भागविण्यात यावा.

४.	सदर शासन निर्णय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौसं-२३२/इमा-२, दि.११.०३.२०१६ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २०८/१९/व्यय-५, दि.०८.०३.२०१९ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharastra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६२६१५०४२९३३१२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Santosh Sampatti Navagire

Digitally signed by Santosh Sampatti Navagire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law And Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=214b4345a2842afe7dd0cbda9e8d83579cbedaaaef30f215ceda096e4e407797, serialNumber=0cb1b0de020015cf6d1f800579271f4816460b1802c2ae247dd6dd6f47462cd3, cn=Santosh Sampatti Navagire
Date: 2019.06.26 15:08:25 +05'30'

(सं.सं.नवगिरे)
कार्यासन अधिकारी

प्रति,

१) मा.प्रबंधक (निरिक्षणे- १/२),उच्च न्यायालय, मुंबई.
२) मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई.
३) महालेखापाल (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१,मुंबई.
४) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
५) निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
६) वित्त विभाग, कार्यासन-व्यय-५, मंत्रालय, मुंबई.
७) विधि व न्याय विभाग, कार्या-२३ व २४ मंत्रालय, मुंबई.
८) निवडनस्ती.